## निशाणी क्र.२२ वरील आदेश.

प्रतिवादी क्र. २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला दिनांक २७.०६.२०१८ रोजीचा विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जामध्ये असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ यांना कागदपत्र न मिळाल्यामुळे व ते आजारी असल्यामुळे त्यांना मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आली नाही. सदर प्रतिवादीने हेतुपुरस्पर जबाब व कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला नाही. सबब, अर्ज मंजुर करण्यास विनंती केली आहे. अर्जाच्या पुष्ठयर्थ निशानी क्र.२३ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**३.** प्रस्तुत अर्जावर वादीने आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे तर्फे असे कथन आहे की, अर्जात दिलेले कारण विश्वासार्ह नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यास विनंती केली आहे.

**४.** दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**५.** प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे खरेदीखत करून मिळणेसाठी दाखल केला आहे. सद्य:स्थितीत दावा हा प्राथमिक सुनावणीसाठी प्रलंबित आहे. दाव्यातील तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठीचा अर्ज प्रलंबित असुन त्यावर अद्याप सुनावणी सुरु झालेली नाही. सबब, अर्जामध्ये दिलेले कारण गृहीत धरता प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला जावु शकतो. दाव्याचे कामकाज गुणदोषांवर चालवून दावा निकाली काढण्यासाठी व भविष्यातील सदरील पक्षकारांचे न्यायालयीन कामकाजाचे प्रमाण टाळण्याकरीता प्रतिवादीतर्फे कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. विलंब माफ करुन कैफियत अभिलेखावर घेतल्याने वादीचे अपरिमित नुकसान होईल, असे वाटत नाही. याउलट, अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादीस त्याचे म्हणणे दाखल करण्यासाठी संधी मिळणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वाच्या

दृष्टीकोणातून उभयपक्षकारांना आपापली बाजू सिध्द करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु, अर्ज मंजुर करताना वादीचे झालेले आर्थिक व वेळेचे नुकसान दुर्लक्षित करून चालणार नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीकोणातून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीला रू.३००/- इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम भरल्यानंतर पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील.

स्वाक्षरीत/-

दिनांक १९.०६.२०१९
कळंब.

(आर.आर.कुलकर्णी)
२रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, कळंब.

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this P.D.F. file Order/Judgment are same word for word as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | V.S.Tonge, |
| Court Name | : | Smt. R. R. Kulkarni,<br>$2^{nd}$ JT. CJJD, Kallam,<br>Dist.Osmanabad. |
| Order/Judgment date | : | 19.06.2019 |
| Order/Judgment<br>Signed by P. O. on | : | 19.06.2019 |
| Order/Judgment<br>Uploaded on | : | 19.06.2019. |